**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि १५ मार्च २०२४**

---

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १५१/२०२४ भादवि १४३,१४७,१४९,३२३,५०४,४२७, मपोकाक १३५ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १४/०३/२०२४ रोजी ११.०० वा चे सुमारास, इंदिरा गांधी कॉलेज केगाव, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०३/२०२४ रोजी २२.०६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | डॉ. बाळगौडा ज्योतीगौडा पाटील, वय- ४५ वर्षे, रा. प्लॉट नं. ७२, अंत्रोळीकर नगर, होटगी रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) श्रीनिवास जोग, २) युसुफ शेख, ३) ए वाय मकानदार, ४) अजरुद्दीन पेरमपल्ली, ५) शेखर धनवले, ६) ज्ञानेश्वर टिंगरे, ७) प्रविणकुमार मोन, ८) निवास शिंदे, ९) रवि गायकवाड, सर्व रा. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीच्या मुलींची सिंहगड इन्टीटयुट येथे परीक्षा सुरु असल्याने त्यांना जेवणाचा डबा देण्याकरीता तसेच, फिर्यादीच्या नोकरीच्या ठिकाणी इंदिरा गांधी कॉलेज येथे रजेवरुन हजर होणेकरीता फिर्यादी व फिर्यादीची पत्नी जात असताना कॉलेजचे चेअरमन दिलीप गायकवाड दिसले असता त्यांना बोलून ते तिघे मिळुन कॉलेज येथे पोहोचले. तेव्हा केबीनला लॉक होते त्यामुळे फिर्यादीने शिपाई महेश पाटील यास वर्कशॉप ची चावी घेवून येण्यास सांगितले. महेश पाटील हा खुप वेळ झाला तरी न आल्याने फिर्यादीने त्यास फोन करुन विचारणा केली असता गिलाणी सर हे चावी देण्यास नकार देत आहेत असे सांगितले. तेव्हा सर्वजन मिळफन वर्कशॉप येथे गेले तेव्हा तेथे हजर असलेले आरोपीत क्रं. ३ व ५ यांनी अचानक पणे चेअरमन गायकवाड सर व व्हाईस चेअरमन शितल गायकवाड यांच्यावर मारण्याकरीता धावून आले तेव्हा फिर्यादी त्यांना मारण्यापासुन थांबविले. तेव्हा आरोपीत क्रं. ५ यांच्या हातातील रॉड हे आरोपीत क्रं. ३ यांनी घेवून ते फिर्यादीस मारण्याकरीता फिर्यादीच्या अंगावर आले तेव्हा तेथे हजर असलेले आरोपीत क्रं. ४ यांनी आरोपत क्रं. ३ यांना थांबविले. तेव्हा लगेच चेअरमन गायकवाड यांच्या केबिन मध्ये वरील आरोपीत क्रं. १ ते ९ असे मिळुन आले व त्यांनी फिर्यादी यांनी त्यांना नोकरीवरुन कमी केल्याचा राग मनात धरुन काहीएक न बोलता फिर्यादीस लाथाबुक्याने तोंडावर, कानावर व पोटात मारहाण केली. तसेच फिर्यादीच्या भावाच्या मालकीची असलेली बोलेरो गाडीच्या उजव्या बाजुच्या मध्यल्या दरवाज्याची काच फोडुन नुकसान केले आहे म्हणून. फिर्यादीची वरील आरोपीतांविरुध्द तक्रार आहे. तपास:- सपोनि- बारावकर- ९४०३६९६३४२ |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १५२/२०२४ भादवि १४३,१४७,१४९,३२३,५०४,४२७,५०४,५०६, मपोकाक १३५ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १४/०३/२०२४ रोजी ११.३० वा चे सुमारास, इंदिरा गांधी कॉलेज केगाव, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०३/२०२४ रोजी २३.०२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सौ. अनामिका रविंद्र गायकवाड, वय- ४४ वर्षे, रा. प्लॉट नं. ३६, अंत्रोळीकर नगर भाग-१, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) शितल डी कवठेकर, २) दिलीप सय्याप्पा गायकवाड, ३) बी जे पाटील, ४) राणी पाटील, ५) नागेश गवड, ६) गंगाधर केमशेट्टी, सर्व रा. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील इंदिरा गांधी कॉलेज केगाव येथे कॉलेजचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम असताना यातील आरोपीत क्रं. १ हिने मुलीच्या हॉस्टेलवर जावून विद्यार्थीनींना कार्यक्रमाला जायचे नाही म्हणून धमकी दिली आहे. त्यानंतर कार्यक्रम सुरु असताना नमुद आरोपीत हे तेथे येवून प्रभारी प्राचार्य गिलानी व स्टाफ यांना कार्यक्रम करु नका म्हणून शिवीगाळ केली व तुम्हाला कार्यक्रम करु नका सांगितलेले समजत नाही का, तुम्ही रेशन निघुन जा अशी धमकी दिली व धक्काबुक्की |

| | | |
|---|---|---|
| | | केली. तसेच कार्यक्रमात आलेल्या विद्यार्थांना शिवीगाळ करत कनक वैद्यवी हिला पाणी पिण्याचा काचेचा ग्लास फेकुन मारला व वर्कशॉप मधील मशीनची तोडफोड करुन कार्यक्रम बंद केली. तसेच प्राचार्य रुमचे लॉक तोडुन खिडकीच्या काचा तोडल्या व केबीन मधील मौल्यवान वस्तु तोडल्या. त्यांनतर आरोपीत क्रं. ३ याने शिवीगाळ करत असताना सोडवायला आलेल्य वार्डन युसुफ शेख यांचे शर्ट फाडला व चापट मारली व शिवीगाळ करुन दमदाटी केली आहे. तसेच आरोपीत क्रं. ३ व ४ यांनी फिर्यादीस खोटया केस मध्ये अडकवितो अशी धमकी दिली. तसेच आरोपीत क्रं. १ व ३ यांनी फिर्यादीस आम्ही हायकोर्ट व सुप्रीम कोर्ट यांना जुमानत नाही आमच कोर्ट आम्ही चालवितो असे म्हणून दमदाटी केली आहे म्हणून. तपासः- सपोनि- बारावकर- ९४०३६९६३४२ |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १५०/२०२४ भादवि ३८०,४५४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १२/०३/२०२४ रोजी सकाळी ०९.३० वा ते दुपारी १५.०० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०३/२०२४ रोजी २०.०२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सौ. सुप्रिया राहुल पाटील, वय- ३८ वर्षे, रा. घर नं. ५०१/६२, खंडाळकर नगर, वसंत विहार अवंती नगरचे पाठीमागे, बलदवा हॉस्पीटल जवळ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | २०,०००/- रु रोख रक्कम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी, फिर्यादीचे पती व मुलगी असे फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दरवाजास बाहेरुन कडी-कुलुप लावुन शाळेत/कॉलेजध्ये गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशानेतरी तोडुन घरामध्ये प्रवेश करुन बेडरुम मधील कपाटातील रोख रक्कम चोरुन नेली आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ६३ पाडवी- ९८२२३८६३८३ |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १०५/२०२४ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १४/०३/२०२४ रोजी ०७.०० वा चे सुमारास, भुमकर ट्रेडर्स, मार्केट यार्ड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०३/२०२४ रोजी ११.१७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | बाबुशा केरबा साळुंखे, वय- ४३ वर्षे, रा. अश्विनी कॉम्प्लेक्स, फ्लॅट न. ११०, अशोक चौक, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १५,०००/- रु एक लाल रंगाची हिरो होन्डा स्प्लेंडर मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची मोटार सायकल क्रं. एम एच १३ बी बी ७९५० ही वरील ठिकाणी पार्क केली असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीवाचुन मुद्दाम लबाडीन चोरुन नेली आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ १३८१ गंगावणे- ७४९९१०१३९१ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ११७/२०२४ भादवि ३२४,३२३,५०४,५०६,३४,४२७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १४/०३/२०२४ रोजी १७.३० वा चे सुमारास, रविवार पेठ, जोशी गल्ली, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०३/२०२४ रोजी २३.११ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पारुबाई ज्ञानेश्वर सरवदे, रा. २७/२९, रविवार पेठ, जोशी गल्ली, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) मम्मी सरवदे, २) गणेश सरवदे, ३) राजपाल सरवदे, ४) भावजय- रंजाना शाम चौगुले, सर्व रा. रविवार पेठ, सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या पाणी भरत असताना नमुद आरोपीत हे फिर्यादीचे घरी आले व आरोपीत क्रं. १ हिने फिर्यादीस तुझे माझा मयत भाऊ नागा चौगुले याचे सोबत प्रेमसंबंध होते या कारणावरुन आरोपीत क्रं. १ हिने हातातील काठीने हातावर मारली व आरोपीत क्रं. २ याने लोखंडी रॉडने डोकीस मारले, आरोपीत क्रं. ३ याने पोटात लाथ मारली व आरोपीत क्रं. ४ हिने हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करुन, शिवीगाळ केली. त्यावेळी फिर्यादीचा मुलगा सचिन आला असता आरोपीत क्रं २ व ३ यांनी रिक्षावर काठीने मारहाण करुन नुकसान केले. तसेच त्यालाही हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करुन तुम्ही गल्लीत कसे राहता असे म्हणून शिवीगाळी, दमदाटी केली आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ९९३ पैकेकरी- ७४१०११२९९३ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ११८/२०२४ भादवि ३८० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १३/०३/२०२४ रोजी १९.०० वा ते दि. १४/०३/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वा चे दरम्यान, मुळेगाव फाटा, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०३/२०२४ रोजी २३.४८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | निरंजन श्रीधर मिठ्ठा, वय- ४३ वर्षे, रा. १२३, गणेश पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १३,२००/- रु त्यात इलेक्ट्रीक मोटार, ३५ हायमर पट्टी, मिशन पंखा असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे हैद्राबाद रोडवरील नमुद ठिकाणचे मिरची दळण्याच्या गिरणी दुकानाचे पुढील बाजुचा पत्रा कशानेतरी फाडुन व उचकटुन, दुकानात प्रवेश करुन, वरील नमुद वर्णनाचे मिरची दळण्याचे साहित्य फिर्यादीचे संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेले आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ १०७६ पवार- ९०२२५८३३५३ |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १८६/२०२४ भादवि ३४१,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १३/०३/२०२४ रोजी १६.१५ वा ते १६.३० वा चे सुमारास, भुमी अभिलेख कार्यालय, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०३/२०२४ रोजी २०.०४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | डॉ. संदिप शंकरराव आडके, वय- ५३ वर्षे, रा. १/१, पी डी आडके हॉस्पीटल, सिव्हील हॉस्पीटल शेजारी, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) कुमार करजगी, २) विक्रांत खुळे, ३) करजगी यांचा ड्रायव्हर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व आकुडे असे मिळुन भुमी अभिलेख कार्यालयात अपिल असल्याने गेले असता, तेथे आरोपीत मजकुर हे देखील आले होते. अपिलचे काम संपलेनंतर फिर्यादी हे घरी जाणेसाठी आले असता आरोपीत मजकुर यांनी फिर्यादीस तुम्हाला लय मस्ती आली आहे, आमचे विरुध्द नेहमी हरकती घेता, जुनी मिलचे जागेमध्ये पडु नका असे म्हणून आरोपीत क्रं. १ याने आकुडे याच्या खांदयावर जोरात धक्का दिला. त्यानंतर ते पार्कीगकडे गेले असता, तेथे आरोपीतांनी त्याची गाडी आडवी लावून तुम्ही येथुन कसे जाता असे म्हणून पुन्हा दमदाटी करु लागले. त्यावेळी तुम्हाला जे करायचे आहे ते कायदेशीर करा असे नका त्रास देवू असे म्हणले व पोलीसांना फोन केला असता नमुद आरोपी तेथुन निघुन गेले आहेत म्हणून. तपासः- पोहेकॉ/ १४०५ गायकवाड- ९८२३०१२३४१ |

## सलगर वस्ती पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३३/२०२४ भादवि ३८०,४५४,४५७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ११/०३/२०२४ रोजी १३.०० वा ते दि. १२/०३/२०२४ रोजी १०.३० वा चे दरम्यान, फिर्यादीच राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०३/२०२४ रोजी २२.१३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुरेखा सिद्राम गायकवाड, रा. नियोजीत सर्वोदय सहकारी गृहनिर्माण संस्था उमेदपुर चर्चच्या मागे, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ८०,०००/- रु त्यात २ तोळेचे सोन्याचे चैन, रोख रक्कम, दोन बॅगेतील वापरते २७ साडया व मुलींचे ११ ड्रेस, एटीएम कार्ड, आधार कार्ड पॅनकार्ड, कामगार कार्ड |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या घराला कुलुप लावुन, पुणे येथे मुलीकडे भेटायला गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे दरवाजाचे कुलुप कशानेतरी तोडुन आत प्रवेश करुन किचन रुमच्या कट्टयावर ठेवलेले बॅगेतुन नमुद वर्णनाचे व किंमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम व कपडे चोरुन नेले आहे म्हणुन. तपासः- पोहेकॉ/ ७५४ कुंभार- ९८२३६२१७५४ |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १२४/२०२४ भादवि ४०६,४२०,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १३/०६/२०२२ रोजी ते आजतागायत, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०३/२०२४ रोजी १८.०३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | आदित्य पुरुषोत्तम पडसलगी, वय- २९ वर्षे, रा. २९ बी, १/१४, पद्मा नगर, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) प्रकाश थाडाराम वासवानी, रा. वाघोली, पुणे, २) धनाजी मनु वाघारी, रा. अशोक नगर, येरवडा, पुणे- |
| **फसवणुक र.** | : | ३६,००,०००/- रुपये किंमतीचा टॉवेल, बेडशीट, ब्लँकेट्स असा तयार माल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादीचा पडसलगी टेक्सटाईल एजन्सी या नावाने टॉवेल, चादर, ब्लँकेट, बेडशीट इ कमीशनवर विक्री करण्याचा व्यवसाय आहे. दि. १३/०६/२०२२ रोजी ते दि. ११/०९/२०२२ या कालावधीत वेगवेगळया कारखानदारांकडुन माल घेवून तो आरोपीत क्रं. १ याचे श्री. सेठ सावरिया ट्रेडर्स, पुणे नावाच्या फर्मला २४,०३,९४६/- रु चा व आरोपीत क्रं. २ यांचे कल्पना सारी, पुणे या फर्मला ११,९६,०००/- रु किंमतीचा एकुण- ३६,००,०००/- रु चा टॉवेल, बेडशीट, ब्लँकेट्स चे तयार माल पुरविला आहे. तरी वरील आरोपीतांनी फिर्यादीकडुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन वेळोवेळी माल घेवून त्याचे पैसे फिर्यादीने वारंवार मागितले असता, वरील आरोपीतांनी पैसे देण्यास टाळाटाळ करुन फिर्यादीची फसवणुक केली आहे म्हणून. तपासः- सपोनि- सोळुंके- **९५५२२८५९००** |